आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १०९ वा ● शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## रोटरी मिडटाऊनच्या आदर्श शिक्षक सन्मान पुरस्कारांचे रविवारी वितरण

लातूर/प्रतिनिधी: रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने वर्ष २०२४ -२५ साठी आदर्श शिक्षक सन्मान पुरस्कार देण्यात येणार असून रविवारी या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. लातूर शहरात शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य केलेल्या शिक्षकांचा रोटरी इंटरनॅशनलच्या वतीने सन्मान करण्यात येतो.यावर्षी रेनिसन्स विद्यालयाचे महेश बांगर, सरस्वती विद्यालयाच्या साधना धर्माधिकारी, शाहू महाविद्यालयाचे अभय देशमुख.

दयानंद महाविद्यालयाच्या प्रा.मेघा पंडित,शाहुचे प्रा.अनिरुद्ध बिराजदार,जिप शिक्षण विभागाचे विवेक सौताडेकर यांचा आदर्श शिक्षक सन्मान पुरस्कार (नेशन बिल्डर अवॉर्ड)देऊन गौरव करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम रविवार दि.२२ सप्टेंबर रोजी सायकाळी ५ वाजता कस्तुर कंचन सभागृह, श्रीकिशन सोमाणी विद्यालय येथे संपन्न होणार आहे.

# पीएम विश्र्वकर्मा योजनेतून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

वर्धा (जिमाका) : पीएम विश्र्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. ही योजना म्हणजे देशात हजारो वर्षापासून असलेल्या पारंपरिक कौशल्याचा वापर विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. या कौशल्यामध्ये सर्वाधिक भागिदारी अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजसमुहाची आहे. या समुहातील कारागिर उद्योजक व्हावेत असा आमचा प्रयत्न असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देण्यासोबतच 'सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राच्या बहुआयामी प्रगतीचा नायक शेतकरीच राहणार असून त्याच्या समृध्दीसाठी सरकार सर्व आघाड्यांवर प्रयत्नशील राहणार असल्याचीही ग्वाही प्रधानमंत्र्यांनी येथे दिली.



पीएम विश्र्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा वर्धा येथील स्वावलंबी मैदानात आज पार पडला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत होते. राज्यपाल डॉ.सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदी उपस्थित होते.

अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला.

आजच्याच दिवशी १९३२ मध्ये महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निर्मूलनसाठी सुरू केलेल्या अभियानाची आठवण करुन देतानांच बापूजींची कर्मभूमी आणि विनोबांची साधनाभूमी असलेल्या वर्ध्यातून विकसित भारताची निर्मिती करण्याच्या आमच्या संकल्पास ऊर्जा मिळते, असे सांगून प्रधानमंत्री म्हणाले, विश्र्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीच्या सोहळ्यासाठी आम्ही यामुळेच वर्ध्याची निवड केली. ही योजना केवळ एक सरकारी कार्यक्रम नसून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी देशात हजारो वर्षापासून असलेल्या कौशल्याचा वापर करण्याचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. इतिहासात आपल्या देशातील समृध्दीचा मोठा आधार पारंपरिक कौशल्य हाच होता. येथील वस्त्रोद्योग, शिल्पकला, धातूविज्ञान, अभियांत्रिकी अशा साऱ्याच बाबी जगात वैशिष्टपूर्ण होत्या. जगातील सर्वात मोठा वस्त्रनिर्माता भारतच होता. मात्र पारतंत्र्याच्या कालखंडात इंग्रजांनी स्वदेशी कौशल्य नष्ट केले. या पार्श्र्वभूमीवर गांधीजींनी वर्ध्यातूनच ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात बलुतेदारी समुहाची सातत्याने उपेक्षा झाली. त्यामुळेच प्रगती आणि आधुनिकतेत देशाची पिछेहाट झाल्याची खंत प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

कारागिरांच्या पारंपरिक कौशल्याचा सन्मान, सामर्थ्य आणि या समाजसमूहाची समृध्दी ही या योजनेमागची मूळ भूमिका असल्याचे स्पष्ट करुन श्री. मोदी म्हणाले, देशातील सातशेहून अधिक जिल्हे, अडीच लाखांहून अधिक ग्रामपंचायती तसेच हजारो स्थानिक नागरी संस्था या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील आहेत. दहा लाखांहून अधिक लोक या योजनेशी जोडले गेले असून आठ लाख शिल्पकारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले गेले आहे. त्यात केवळ महाराष्ट्रातीलच साठ हजारांहून कारागिर समाविष्ट आहेत. त्यांच्या कामाला आधुनिक आणि डिजिटल तंत्रज्ञानाची जोड दिली जात आहे. साडेसहा लाख बलुतेदारांना आधुनिक साधने दिली गेली आहेत. या योजनेचा सर्वाधिक फायदा याच समाजसमूहांना होत आहे. त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देण्यासोबतच 'सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रात मोठ्या औद्योगिक विकासाची क्षमता असून त्यात वस्त्रोद्योग हा अग्रणी आहे. विदर्भात कापसाचे क्षेत्र मोठे असुनही येथील शेतकऱ्यांची यापूर्वी उपेक्षा झाल्याची खंत व्यक्त करुन प्रधानमंत्री मोदी म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर नांदगाव खंडेश्र्वर येथे टेक्सटाइल पार्कची निर्मिती झाली. आता अमरावती येथे होत असलेले पीएम मित्रा पार्क हे वस्त्रोद्योगास नवी झळाळी प्राप्त करुन देण्याच्या प्रयत्नातील पुढचे पाऊल आहे. फार्म टू फायबर, फायबर टू फॅब्रिक, फॅब्रिक टू फॅशन आणि फॅशन टू फॉरेन अशा सुत्रातून आमचे प्रयत्न सुरू असून विदर्भातील उच्च दर्जाच्या सूतापासून तयार होणारे कपडे परदेशात निर्यात होऊन येथील शेतकरी समृध्द होतील. अमरावतीच्या पार्कमध्ये दहा हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून १ लाखाचा रोजगार उपलब्ध होईल. औद्योगिक विकासासाठी पुरक असणाऱ्या विविध पायाभूत सुविधांचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. विदर्भातील सिंचन विकासासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा योजनेच्या अंमलबजावणीतून १० लाख एकर क्षेत्र सिंचित होणार आहे. याशिवाय कांदा, सोयाबीन उत्पादकांनाही विविध निर्णयाच्या माध्यमातून सरकार मदत करत आहे, असे प्रधानमंत्र्यांनी आवर्जून सांगितले.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



देशातील गरीब, वंचित तसेच परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्र्वकर्मा ही योजना अत्यंत महत्वाची आहे. या योजनेच्या माध्यमातून कारागिरांनी केलेल्या उत्पादित वस्तुंना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याला प्राधान्य राहणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा देशाचे नेतृत्व करत आहेत, त्यांच्या खंबीर पाठबळामुळे राज्याची प्रगती गतिमानतेने होत आहे. अमरावती येथे पीएम मित्रा पार्क हा देशातील वस्त्रोद्योगाच्या विकासाला चालना देणारा ठरणार आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसावर प्रक्रिया करून कापड निर्यातीला चालना मिळणार आहे. या पार्कमध्ये १० हजार कोटीची गुंतवणुक होणार असून सुमारे १ लाखापेक्षा जास्त रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनांमुळे राज्यातील महिला व इतर घटकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला पोषक ठरणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी

केंद्रीय लघु, सुक्ष्म व मध्यम उद्योग मंत्री जीतनराम मांझी यावेळी म्हणाले, पीएम विश्र्वकर्मा ही योजना पारंपरिक कारागीर व शिल्पकारांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडविणारी आहे. त्यांना उच्च गुणवत्ता व प्रशिक्षण देऊन त्यांनी उत्पादित केलेला माल जागतिक बाजारपेठेत पाठवण्यास प्राधान्य दिले आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात १ लाख ४६ हजार कारागिरांची नोंदणी झाली आहे. कारागिरांना अत्याधुनिक साधनांसाठी ५ टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येत असून त्यांच्या उत्पादीत वस्तुंना मोठी बाजारपेठ निर्माण करण्यात आली आहे. भारतातील कारागिरांनी तयार केलेल्या विविध वस्तुंच्या उत्पादनांचे प्रदर्शन वर्धा येथे आयोजित करण्यात आले असून या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामिण कारागिरांना प्रोत्साहन मिळणार असल्याचे श्री.मांझी यांनी यावेळी सांगितले.

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



देशातील सात पीएम मित्रा पार्कपैकी अमरावती येथे होत असलेल्या पार्कच्या माध्यमातून कापसापासून कापडापर्यंत व कापडापासून फॅशनपर्यंतच्या सर्व प्रकारच्या एकत्र सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे मोठ्या गुंतवणुकीसह रोजगार उपलब्ध होईल. पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या बारा बलुतेदारांच्या विकासाचा विचार अद्यापपर्यंत कोणीही केला नाही, परंतू प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पीएम विश्र्वकर्मा सारख्या योजनेच्या माध्यमातून बाजारपेठेला अनुकूल असलेल्या वस्तुंची निर्मिती करण्यासाठी प्रशिक्षणासह आर्थिक सहाय्य कारागिरांना उपलब्ध करून दिले आहे. याचा लाभ समाजातील शेवटच्या कारागिरापर्यंत पोहोचत आहे. बलुतेदार समाजसमुहाच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची मोठी संधी या योजनेमधून उपलब्ध झाले असल्याचे सांगून शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतल्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

### उपमुख्यमंत्री अजित पवार



पीएम मित्रा पार्कच्या माध्यमातून विदर्भासह राज्याच्या औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. या पार्कमुळे पांढऱ्या सोन्याला खऱ्या अर्थाने सोन्याचे दिवस येणार असून येथे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अत्यंत कमी कालावधीमध्ये मोठे प्रकल्प गतिमानतेने पुर्ण केल्यामुळे पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा विक्रम केला असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणुक करण्यास उत्सुक आहेत. गडचिरोली येथे स्टील उद्योग तसेच महापे येथे सेमी कंडक्टर या उद्योगांचा यामध्ये समावेश आहे. प्रधानमंत्र्यांच्या विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आमचे सरकार संपुर्ण योगदान देईल, असा विश्र्वास यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

कारागिरांना प्रमाणपत्र, धनादेशाचे वितरण

प्रधानमंत्र्यांनी कळ दाबून अमरावती येथील पीएम मित्र पार्क, राज्यातील १ हजार आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्रांचे उद्घाटन केले तसेच पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्ट अप योजनेचा शुभारंभ केला. पीएम विश्र्वकर्मा योजनेच्या १ लाख कारागिरांना ओळखपत्र व प्रमाणपत्र तसेच १ लाख कारागिरांना डिजिटल कौशल्य प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. देशभरातील ७५ हजार कारागिरांना कर्जाचे वितरण देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले. पीएम विश्र्वकर्मा योजनेच्या वर्षपुर्तीनिमित्त भारतीय डाक विभागाने काढलेल्या विशेष डाक तिकिटाचे अनावरण प्रधानमंत्र्यांनी केले.

सुरुवातीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चरख्याची प्रतिकृती तर केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी यांनी ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या कलाकृती भेट देऊन प्रधानमंत्र्यांचे स्वागत केले. लघु, सुक्ष्म व मध्यम विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या परंपरागत ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या विविध आकर्षक कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.पंकज भोयर, दादाराव केचे, समीर कुणावार, माजी खासदार रामदास तडस, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ.विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आदींची उपस्थिती होती.

## ड़ॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायमस्वरुपी ७५ फुट पुर्णाकृती पुतळा उभारणे करिता आपले मत नोंदवा मनपाचे आवाहन...

लातूर/प्रतिनिधी : लातूर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायमस्वरुपी ७५ फुट पुर्णाकृती पुतळा उभारणे करणे करिता आपल्या महानगरपालिकेच्या mclatur.org या संकेतस्थळावर व महानगरपालिका कार्यालायात, येथे वेगवेगळे असे ३ प्रकारचे मॉडेलच्या प्रतिकृतीचे संकल्पचित्र ठेवण्यात आले असुन महानगरपालिकेमध्ये ठेवलेल्या बंद पेटीमध्ये Option 1, Option 2 , Option 3 पैकी एक दिनांक २५.०९.२०२४ रोजी पर्यंत आपले मत कळवावे असे आवाहन आयुक्त, बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याची मागणी

भोकर - भोकर शहरातील भारतरत्न



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवून जागेचे सुशोभीकरण करून त्या ठिकाणी पुतळा उभारण्याची मागणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आली आहे.सात दिवसापर्यंत अतिक्रमण न हटविल्यास आमरण उपोषणाचा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

उपविभागीय अधिकारी यांना दिनांक २० सप्टेंबर रोजी येथील सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेवर बऱ्याच वर्षापासून दिलीप उत्तरवार आणि पांडूरंग इंगळे हे दोन व्यापारी अतिक्रमण करून आपली दुकाने टाकून व्यापार करत आहेत सदरचे अतिक्रमण काढण्यात यावे म्हणून अनेक वेळा मोर्चे आंदोलने उपोषणे करण्यात आली परंतु अतिक्रमण काढल्या गेले नाही. दिलीप उत्तरवार आणि पांडूरंग इंगळे हे दोघेही व्यापारी गर्भश्रीमंत असून भोकर शहरात त्यांना मोक्याच्या ठिकाणी बिल्डिंगा शेतीबाडी आहे.पण ते अतिक्रमण काढण्यास तयार नाहीत तसेच शासनही अतिक्रमण हटवण्यासाठी उदासीनता दाखवत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार थोर समाजसुधारक आहेत ते एका मागासवर्गीय दलित समाजात जन्माला आले म्हणून की काय ? प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ही या थोर पुरुषांच्या पुतळा जागेवरील अतिक्रमण हटविण्यास टाळाटाळ करीत आहेत.याचा आम्हाला खेद वाटतो. शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील नियोजित पुतळ्याच्या जागेवर उतरवार आणि इंगळे या दोघांनी थाटलेली दुकाणे तात्काळ काढून टाकण्यात यावीत, त्यांचेकडून नगरपालिकेतर्फे भाडे वसूल करून तिथे सुशोभीकरण करून २१ फुट उंचिचा पुतळा उभारण्यात यावा,शहरातील इतर महामानवाचे पुतळे टप्प्या टप्प्याने उभारण्यात यावेत आधी मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहे. प्रशासनाने सदरील अतिक्रमण त्वरित न हटवल्यास सात दिवसानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशाराही निवेदन कर्त्यांकडून देण्यात आला आहे.

सदरील निवेदनाच्या प्रती तहसिलदार, मुख्याधिकारी, पोलिस निरिक्षक यांना देण्यात आले आहे.

सदरील निवेदनावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एल ए हिरे, मा.नगर सेवक मनोज गिमेकर ,पत्रकार सिद्धार्थ जाधव,सुभाष तेले, सामाजिक कार्यकर्ते दत्ता डोंगरे ,पत्रकार शंकर कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# चापोली ग्रामपंचायतने गाठला निष्क्रियतेचा कळस

चापोली : चाकूर तालुक्यातील चापोली ग्रामपंचायत कार्यालयाने निष्क्रियतेचा कळस गाठल्याचे निदर्शनास येत असून गावातील अनेक विकास कामांकडे सरपंच आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष्य होताना दिसत आहे. गावातील प्रभाग क्रं. ५ च्या नागरिकांना अनेक नागरी समस्यांचा सामना करावा लागत आहे. वारंवार ग्राम पंचायत प्रशासनापुढे हा विषय काढूनही त्याकडे हेतुतः दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे वैतागलेल्या रहिवाशांनी ग्राम पंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा एका लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.



चापोली येथील प्रभाग क्रं . ५ मधील वसाहत झोळी या नावाने ओळखली जाते. या वसाहतीत रामचंद्र नरहरे यांच्या घरापासून ते गंगाधर स्वामी यांच्या खुल्या प्लॉटपर्यंत सिमेंट रस्ता , नळ योजना व विजेची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी या भागातील नागरिक मागच्या अनेक दिवसांपासून ग्राम पंचायत प्रशासनाकडे करत आहेत. रस्त्याची सुविधा नसल्याने नागरिकांना ये - जा करताना अक्षरशः कसरत करावी लागत आहे. त्याचा त्रास लहान मुले - वडीलधाऱ्या मंडळींनाही सहन करावा लागत आहे. या भागातील नागरिकांनी आपल्या या न्याय मागण्या वेळोवेळी सरपंच आणि प्रभागातील तिन्ही ग्राम पंचायत सदस्यांकडे केल्या आहेत. परंतु नागरिकांच्या मागण्यांकडे सगळ्यांनीच हेतुपुरस्सरपणे दुर्लक्ष्य करण्याचे काम केले आहे. नागरिकांनी आपल्या मागण्यांचे निवेदन दिले तरी त्याची ग्राम पंचायतच्या आवक - जावक रजिस्टरला त्याची नोंदही करून घेतली जात नसल्याचा आरोप या नागरिकांनी ग्रामपंचायतला दिलेल्या निवेदनात केला आहे.

त्यामुळे येत्या दि. ६ ऑक्टोबर २०२४ पर्यंत जर चापोली ग्राम पंचायतने नागरिकांच्या मागणीप्रमाणे नागरी सुविधांची पूर्तता केली नाही तर वस्तीतील सर्व रहिवासी ग्राम पंचायत कार्यालयासमोर दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून आमरण उपोषणास बसणार असल्याचे निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर गंगाधर रेवणप्पा स्वामी, सोमेश शिवप्पा स्वामी, शिवलिंग बाबय्या कासनाळे, शिवकुमार रत्नाकर आलमले , शैलेश रमाकांत कासनाळे, बालाजी माधव आबंदे, शंकर व्यंकट कदम, सोमनाथ नागनाथ श्रीमंगले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रति चाकूरचे तहसीलदार, पोलीस निरीक्षक , गट विकास अधिकारी, पंचायत समिती चाकूर यांनाही देण्यात आल्या आहेत.

**दिवाळी अंक निमित्त जाहिरातीसाठी संपर्क करा !**

सर्व दैनिक लातूर प्रभात या वृत्तपत्र वाचकास नम्र विनंती की, दरवर्षा प्रमाणे याही वर्षी दिवाळी निमित्त विशेष अंक प्रकाशीत करण्यात येत आहे, कृपया आपल्याकडून जाहिरातीची अपेक्षा आहे.
E-mail.
laturprabhat@gmail.com

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – भिक्षेकरी गृहासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी काळ्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला ही शिंदे सरकारची न्यायिक योजना ठरावी असे वाटते पण विरोधक सदरील योजना स्वीकारतील की नाकारतील हे एक कोडेच वाटते, डोकं वैतागलं आहे.

दुसरा – अरे, कोणत्याही पक्षाचे–आघाडी, महायुती, युती, महाविघाडीचे सरकार असले तरी त्यांच्या खिशातून किंवा बाप कमाईतून त्यांचे काहीही जाते नसते केवळ लोककर–मुहूरमुळातून सर्व काही होत असते एकीकडे योजना लागू करायच्या आणि दुसरीकडे भाव वाढ करून भरपाई करायची त्यातलाच हा प्रकार आहे तू कशाला लुडबुड करतो आहेस.

एक – अहो, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकेकाळी शिवसेनेचे कार्यकर्ते होते. ते लोकनिधी जमा करूनच शिवसेना प्रमुख बाळ ठाकरे यांची झोळी भरत होते त्यांनीच भिक्षेकरी गृहासाठी, त्या लाभार्थींसाठी अशी योजना का व कशासाठी केली असेल हेच समजत नाही म्हणून बोलतो आहे समजलं.

दुसरा – अरे, निवडणुका जवळ आल्या की अशा योजना उपजत असतात पुन्हा काहीच नसते ही एक बोलधावडी– चांडाळ कसरत असते समजले.

एक – अहो, असे वाच्याळ, अपशब्द वापरू नका हा लोकशाही भारत आहे.

दुसरा – अरे, गप्प बस कार्ट्या एक देश, एक निवडणूक आणि भिक्षुकरी गृहासाठी ची जी योजना आहे त्यात नरेंद्र मोदी यांचे गुपित आहे कोणाला सांगू नकोस.

## काय बोलता राव ?

पुणे हे भारतीय मानवी संस्कृतीत शिक्षणाचे माहेरघर समजले जाते. शिक्षणाची पंढरी म्हणून पुणे या शहरास संबोधीले जाते त्याचे मूळ कारण एक अस्पृश्य समाजातील बॅरिस्टर बी आर आंबेडकर यांनी उच्चस्त शिक्षण घेतले ते भाग निराळा असला तरी पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट– संस्था प्रकरणी जे काही वादळ उठले आहे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाजपा नेच उठविले आहे असा तर १९८० च्या दशकात गोखले संस्था ही आरएसएसचा अड्डा–मैदान होते असे त्यावेळी आमच्यासमोर आमचे मास्तर बोलत होते. म्हणूनच त्या बद्दल प्रक्रियेतील डॉ. रानडे शिकार बनले.

**काय बोलता राव,**

अरे, गोखले संस्था परिवर्तनवादी असली तरी ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी बांधिल आहे असा समज होता पण डॉ. रानडे यांनी सुधारणा करून नाविन्यपूर्ण प्रयोग परिवर्तनवादी धोरण स्वीकारून कृषी, उद्योग, व्यवसायाला महत्त्व दिले आणि यातच सारे दुखणे समोर आल्याने शैक्षणिक क्षेत्रातील पाय धुणे बनलेले विचारवंत संशोधकांनी विश्र्वगुरू बन पाहणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पायचाटक्यानी गोखले संस्थेचीच नाळ तोडून स्वतःचे हासू करून घेतले पण डॉ.रानडे शांत कसे बसतील मग बोला दाजीबा !

## कर्करोगाच्या आजाराबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे

उदगीर (ता.प्रतिनिधी) : भारतामध्ये दरवर्षी



कर्करोगाच्या आजाराने ८० हजार महिला मृत्यू पावत आहेत. कर्करोगाच्या आजाराचे कारण केवळ अज्ञान हेच असून यावर नियंत्रण आणण्यासाठी रोटरी क्लबने कर्करोगाच्या आजाराविषयी महिलांमध्ये जनजागृती करणे काळाची गरज असल्याचे मत रोटरी क्लब डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सन २०२६–२७ चे गव्हर्नर जयेश पटेल यांनी व्यक्त केले. उदगीर येथे रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळा ओमकार मंगल कार्यालयात पार पडला. यावेळी ते बोलत होते. याच कार्यक्रमात रोटरी क्लबच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्राचे शिल्पकार व जीवनगौरव पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब उदगीर सेंट्रलच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी होत्या. व्यासपीठावर रोटरीच्या मावळत्या अध्यक्षा मंगला विश्र्वनाथे, सचिव ज्योती चौधरी, उपाध्यक्ष रवींद्र हसरगुंडे यांची उपस्थिती होती. प्रारंभी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी पुढे बोलताना जयेश पटेल यांनी, देशातील महिलांचा कर्करोगाच्या आजाराने मृत्यू दर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यामध्ये विशेषता स्तनाचा कर्करोग व गर्भाशयाचा कर्करोग या दोन गंभीर आजाराकडे महिला दुर्लक्षित करत आहेत. त्यातूनच आजार बळावत चालल्याने महिलांचा मृत्यू दर वाढत आहे. हा मृत्यूदर नियंत्रणात आणण्यासाठी रोटरी क्लबने आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न सुरू केले आहेत. याबाबतची जाणीव जागृती करण्यासाठी उदगीर रोटरी क्लबने पुढाकार घ्यावा असे सांगितले. यावेळी रोटरी क्लबच्या मावळत्या अध्यक्षा मंगला विश्र्वनाथे यांनी मागील वर्षीचा आढावा सादर केला तर नूतन अध्यक्षा सरस्वती चौधरी यांनी आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी रोटरी क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांना जयेश पटेल यांच्या हस्ते रोटरीची पिन देऊन शपथ देण्यात आली. पाहुण्यांचा परिचय विशाल जैन यांनी करून दिला. शिक्षकांचा परिचय विक्रम हलकीकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विशाल तोंडचीरकर व डॉ. सुलोचना येरोळकर यांनी केले. आभार रोटरी क्लबच्या सचिव ज्योती चौधरी यांनी मानले. कार्यक्रमास रोटरीचे संस्थापक अध्यक्ष किशोर पंदीलवार, संतोष फुलारी, विजयकुमार पारसेवार, प्राचार्य व्यंकटराव कणसे, चंद्रकांत ममदापुरे, डॉ. सुधीर जाधव, अनिल मुळे, भागवत केंद्रे, रामदास जळकोटे, गोपाळ मुक्कावार, कमलेश पेठे, नागरिक, महिला उपस्थित होते.

# खबरदार मोदीजी विरोधात... !

## संपादकीय...

भारत हे लोकशाही राज्य आहे, धर्मनिरपेक्ष–पूरोगामी विचाराचा चेहरा आहे, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, न्याय, हक्काची मानवी संस्कृतीची भारतीय राज्यघटना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली तीवरच आजवरचा भारतीय राज्यकारभार चालतो आहे हा साचा मानवी जगताला मान्य असला तरी भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जो काही भारतीय समाजकारण, राजकारण, सत्ताकारण यात बदल करून जे काही निर्माल्य करण्याचे प्रयोजन केले त्यास दाद किंवा वाव नसावा म्हणूनच खबरदार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विरोधात काही बोलाल तर आम्ही लोकप्रतिनिधी आणि प्रसार माध्यमे तुमच्यावर मधमाशा प्रमाणे तुटून पडल्या खेरीज राहणार नाही याची नोंद घेणे अशीच सर्वत्र कुजबूज होताना दिसते आहे.

सत्तापिपासून लोकप्रतिनिधी हे सत्ताधारी नेतृत्व आणि त्यातील मृगजळावर विसंबून असतात पण आम्ही प्रसार माध्यमे कोणाची मुलाहीजा न बाळगता नेकीने काम करीत असताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या बरोबरीने आम्हाला गळफास लावून तुम्ही जनता काय करीत आहोत असा सवाल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे कार्यालय करीत असेल पण आम्ही–आपण सारे मिळून लोकशाही, संविधान–धर्मनिरपेक्षवादी– पुरोगामी विचाराचे आहोत भारतीय आहोत, समानतावादी आहोत असे असताना कोणा मोदाड संस्कृतीच्या उडीद, मूग, हरभरा, वटाणा, शेंगदाणा असे हायब्रीड विचार प्रकट करून त्या हिंदुत्ववादी आरएसएसच्या गुलाम भडव्याने– कोविंदाने गणपतीतील गोविंदाचे रूप घेऊन एक देश, एक निवडणुक असा जो अहवाल सादर केला तो प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सांगण्यावरून केला असेल पण वैयक्तिक एक भारतीय नागरिक म्हणून नरेंद्र मोदी असे कधीच लोकशाहीला डावळून हुकूमशाही प्रवृत्तीला दुजोरा देणार नाहीत म्हणूनच खबरदार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विरोधात बोलाल, त्यांना हुकूम शहा म्हणाला तर खैर नाही अशी राजकीय वर्तुळात चर्चा होताना दिसते आहे ती अनाठाई ठरावी.

परराष्ट्रीय धोरणात देश गुलाम बनला काय किंवा शैक्षणिक धोरणात बदल घडवून अशा किती तरी खेडकर निर्माण झाल्या त्याबद्दल दुमत नाही कारण भारत महासत्ताक देश बनतो आहे मग एक देश, एक निवडणूक झाली तर लोकशाही आपोआपच संपुष्टात येते आणि कोविंदाचा गोविंदा बनून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विश्र्वगुरू बरोबर गणपती होवून बसतील ही आपली मनुसंस्कृतीची परंपरा असली तरी सरळ मार्गी–सढळ हाताने भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे तृतीयपंथाच्या साक्षीने जो लोकशाहीवादी हुंकार, अहंकार प्रकट करीत आहेत तो लाजवाब असावा खबरदार कोणी वैकुंठ्यामेश्र्वर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना विरोध करून देशद्रोही ठरविणार असेल तर भारतीय प्रसारमाध्यमे गप्प बसणार नाहीत याची नोंद घ्यावी.

# आत्मनिर्भर भारत एक दिवास्वप्न!

काही शब्द असे आहेत,असतात की,ते खूपच प्रभावशाली व मनाला भाळणारे,स्फुर्ती, उत्साह निर्माण करणारे असतात. त्या शब्दाचे महत्त्वही तसेच असते.तो शब्द जर एखाद्या नावासमोर लावला तर ते नाव खूपच प्रभावशाली बनते. अशाच एका शब्दाचा वापर आपल्या पंतप्रधानांनी केला आहे. तो म्हणजे आत्मनिर्भर भारत

आत्मनिर्भर म्हणजे कोणावरही अवलंबून न राहता,स्वयं प्रकाशीत असणे.पुर्णपणे विकसीत,प्रगतशील असणे,म्हणजे आत्मनिर्भर!मग बोललो म्हणजे झालो काय आपण आत्मनिर्भर.तर नाही त्यासाठी आमच्याकडे जी साधने,संसाधने,पायाभुत सुविधा पाहिजे त्या आहेत का,हे पाहावे लागेल. तपासावे लागेल.आणि त्या नसतील तर आम्ही आत्मनिर्भर कसे होणार! आमच्या देशात तर दगड उचलला तेथे समस्या आहे. एवढ्या समस्या निर्माण झाल्या आहेत.असे वाटते अजून १०० वर्ष या समस्या मिटतात की नाही.काय सांगाव! आमचा देश समस्याचा देश आहे की काय असे वाटते.

कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबून असते. कारण शिक्षणाने माणूस ज्ञानी,विद्वत्तापुर्ण,चिकीत्सक विचारीबुध्दिमत्ता कौसल्य,अध्यापण,विवेकशील,शहाणपण,स्पष्ट संवाद,मानव संसाधन विकास,तंत्रज्ञान विकास,मनाची निर्भयता या सर्व गोष्टी मिळतात.म्हणुन जीवनात शिक्षण अंत्यत महत्त्वाचे आहे.खऱ्याअर्थाने शिक्षणातुनच माणूस आत्मनिर्भर होतो.म्हणून महापुरुषांनी शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.महात्मा फुले म्हणतात प्राथमिक शिक्षणासोबतच उच्च शिक्षण सुध्दा सरकारने सक्तीचे करावे. शिक्षणाने अज्ञान,अंधश्रध्दा दुर केल्या जातात,आणि विकासाचा,प्रगतीचा मार्ग मोकळा होतो.पण शिक्षणच जर नसेल तर गरीबी, बेकारी,बेरोजगारी,अज्ञान,अंधश्रध्दा वाढते.आणि मग माणूस आत्मनिर्भर न होता,परावलंबी राहतो.गरीबी वाढण्याचं कारणच शिक्षणाचा अभाव आहे. आणि गरीबीमुळे आर्थिक अडचणी निर्माण होतात,त्यामुळे शिक्षण घेता येत नाही,अशी परिस्थिती होते.

आपल्या देशात खेडी जास्त आहेत,खेड्यातील सर्वच गोरगरीब लोकाची मुले सरकारी (जि.प.) शाळेत शिकतात.२०१७ च्या शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २० राज्यामधील ६५.२ टक्के मुले सरकारी शाळेत शिकतात.शालेय नोंदणी चे प्रमाण ९३ ते ९५ टक्के आहे.त्यांचा शिक्षणाचा दर्जा मात्र सुधारला नाही. ८ वी शिकणाऱ्या मुलाला मराठी वाचता येत नाही.अशी परिस्थिती आहे.आता त्याच शाळा बंद करणे चालू झाले आहे.मग ती गोरगरीब मुले आत्मनिर्भर होणार का? उच्च शिक्षण घेणाऱ्यांच प्रमाण किती,फक्त २५ टक्के आहे.जागतीक विद्यापीठाच्या २०२० च्या जागतिक सर्वेक्षणात असे आढळले की भारतात एकही विद्यापीठ दर्जेदार स्वरुपाचे नाही,की पहिल्या १० च्या यादीत असेल.३३ व्या स्थानी आपला क्रमांक आहे.

२००७ मध्ये प्रधानमंत्री असतांना मनमोहन सिंग यांनी एक खंत व्यक्त केली होती. आपली विद्यापीठे व्यवस्था अनेक भागामध्ये दुरावस्थेच्या अवस्थेत आहेत.देशातील जवळपास निम्म्या जिल्ह्यामध्ये उच्च शिक्षणातील प्रवेश अत्यंत कमी आहेत. आपली जवळपास २/३ विद्यापिठे आणि आमची ९० टक्के महाविद्यालये खालीलप्रमाणे रेट केलेली आहेत.गुणवत्तेच्या मापदंडांवर सरासरी. मला काळजी वाटते की अनेक




राज्यामध्ये कुलगुरुच्या नियुक्त्यासह विद्यापिठाच्या नियुक्त्याचे राजकारण केले गेले आहे.आणि त्या जाती आणि जातीय विचाराच्या अधीन झाल्या आहेत.पक्षपातीपणा आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी आहेत.भारतात जेवढ्या काही शैक्षणिक,उच्च शैक्षणिक संस्था आहेत,त्या राजकीय लोकांच्या आहेत. किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या आहेत. कोण्या गरीब माणसाची, शेतकऱ्यांची,बेरोजगार तरुणांची दिसणार नाही.जागतीक पातळीवर दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत भारत १३९ व्या स्थानावर आहे.याचे कारण भारतात असलेली गरीबी व लोकसंख्या.

पाच देशामिळुन बनलेली (ब्रिक्स) संघटना आणि २० राष्ट्र मिळुन बनलेली जी–२० संघटना. राष्ट्रामधील भारत सर्वात गरीब देश गणल्या गेला. कारण भारताचे दरडोई उत्पन्न सर्वात कमी आहे.भारत देश जगात तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था जरी बनला तरी गरीब राहु शकतो,असे काही जागतिक स्तरावरील तज्ञांचे म्हणणे आहे. ऑक्सफॅमच्या मते भारतात १ टक्के लोकांकडे ७३ टक्के संपत्ती आहे.६७० दशलक्ष सर्वात गरीब लोकांचा समावेश असलेल्या नागरीकांच्या संपत्तीत १ टक्के वाढ झाली आहे. (ऑक्सफॅम हि ब्रिटिश देशाने स्थापन केलेली एक स्वतंत्र संस्था आहे,ती जगातील गरीबी निर्मुलनावर लक्ष केंद्रित करते.) आजही भारतातील बिहार,झारखंड,ओरीसा,छत्तिसगढ,मध्य प्रदेश,उत्तरप्रदेश,उत्तराखंडया राज्यात ६० टक्के लोक गरीब आहेत.खरच आम्ही आत्मनिर्भर म्हणण्याइतपत विकसीत आहोत काय? तर नाही.

आजही भारतात ४० टक्के लोकांकडे ३ टक्के शेती आहे.आणि १० टक्के लोकांकडे ५४ टक्के शेती आहे.किती फरक आहे.आत्मनिर्भर राष्ट्राची अशी विषमतावादी ओळख असते का? आत्मनिर्भर,विकसित राष्ट्राची ओळख तिथल्या शेवटच्या घटकापर्यंत राहणाऱ्या माणसापर्यंत शिक्षणासोबतच सर्व आवश्यक पायाभूत सुविधा पोहचणे होय?. आपल्या देशात दर्जेदार शिक्षणच तर शेवटच्या घटकापर्यंत अजुनही पोहचले नाही.मग आम्ही आत्मनिर्भर कसे ?

जगात दर्जेदार उच्च शिक्षणाच्या सोयी मुळे तेथील तरुण आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळे नवनवीन संकल्पना सादर करुन नवनवीन टेक्नोलॉजी निर्माण करत आहेत. जगात टेक्नोलॉजीच्या बाबतीत खूप मोठी क्रांती,प्रगती (बदल) घडवून येत आहे. ती प्रगती केवळ एका क्षेत्रापुरती मर्यादित नाही तर कृषी,औद्योगीक,वैद्यकीय, शिक्षण सर्वच क्षेत्रात आपल्याला दिसत आहे.

इस्त्रायल हा शेती विकसीत उद्योग करणारा एक असा देश आहे की त्या देशात सर्वात कमी पाऊस पडतो. तरी सुद्धा तो देश कापूस उत्पादनात अग्रेसर आहे. असे म्हणतात की तेथील लोक एकरी ४० ते ५०क्विंटल कापसाचे उत्पादन घेतात.भारतात कपाशी पिकांवर चार पाच वर्षापासून बोंडअळी येऊ राहिली,ते ही नाही दुर होऊ राहिली,याला कारण संशोधनाचा,तंत्रज्ञानाचा अभाव,हिच जर समस्या इस्त्रायल मध्ये असती तर, त्यांनी तात्काळ त्यावर संशोधन केले असते.जापान मध्ये ९९ टक्के लोक शिक्षीत उच्च शिक्षित आहेत.चार टक्के लोकच तेथे बेरोजगार आहेत.म्हणुन तो देश प्रगत आहे.त्यांनी कितीतरी टेक्नोलॉजी विकसित केली .की तो देश आजच्या घडीला २०५० मध्ये जगत आहे.अमेरिका,ब्रिटन,फ्रान्स,जर्मनी,हे देश तर बर आत्मनिर्भर आहेतच,असे देश असतात आत्मनिर्भर! तंत्रज्ञानाने तंत्रज्ञान चालवले जाते या देशात,आम्ही फक्त शब्दाचाच वापर करत आहोत. विश्र्वगुरु भारत आत्मनिर्भर भारत!

भारत तर कृषी प्रधान देश आहे.भारतात आतापर्यंत ८० टक्के शेती सिंचनाखाली यायला पाहिजे होती.ती ४७ टक्के आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही. त्यासाठी आंदोलन करावे लागते. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी शेतकऱ्यांसाठी लागू केल्या जात नाही.अजून शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी पाहिजे तसे रस्ते नाहीत, पाऊस जर चालू राहिला तर रस्त्याअभावी शेतकऱ्याचा माल शेतातच राहतो.अशी परिस्थिती आहे.शासन रस्ता मंजूर करील,त्यावेळी शेतात जाण्यायेण्यासाठी रस्ता होईल हि वाट त्याला पाहावी लागते.बेरोजगार तरुणांना रोजगार मिळण्याची वाट पाहावी लागते,गरीबाला आपली गरीबी कमी करण्यासाठी शासन काही मदत देईल काय याची वाट पाहावी लागते.कारण तशी परिस्थिती निर्माण झाली आहे.मग इथला शेतकरी,भूमीहीन मजुर,बेरोजगार,गरीब आत्मनिर्भर आहे का?.

देशाचे आर्थिक उत्पन्न वाढवायचे असेल तर देशात हजारो एकर शेती ई क्लास, एफ क्लास,सिलींगची,जे काही पडिक पडलेली असेल. ती जमीन भूमीहीन,गरीब गरजु लोकांना वहितीकरीता देणे आवश्यक आहे,त्यामुळे त्यांच्या हाताला काम तर मिळेलच, शिवाय आर्थिक विकास होऊन गरीबी कमी व्हायला मदत होईल,त्यांचे उत्पन्न पण वाढेल व सोबत देशाचे पण उत्पन्न वाढेल,आणि ते आत्मनिर्भर होण्याच्या मार्गावर स्वार होतील.योजना वाढवल्या म्हणजे आर्थिक विकास होत नाही. अर्थव्यवस्थेची गती वाढवायची असेल तर देशातील गुंतवणूक वाढली पाहिजे,पायाभूत सुधारणा झाल्या पाहिजे,भक्कम बँकींग व्यवस्था झाली पाहिजे यातुन विकास दर ठरवला जातो. रोजगार कमी झाला तर गुंतवणूक कमी,त्यामुळे बचतीचा दर कमी,म्हणजे अर्थव्यवस्थेची गती कमी.असे काही अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे.आता सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण,शिक्षणाचे खाजगीकरण,देशातील गोरगरीब मुलांना शिक्षण घेता येईल का? शिक्षणच घेता आले नाही,तर हाताला काम मिळणार नाही. मग आम्ही आत्मनिर्भर कसे होणार!

भारतात आज ३३मिलीयन तरुण बेरोजगार आहेत.१मिलीयन म्हणजे १० लाख,पहा किती कोटी तरुण बेरोजगार आहेत.भारतात १४० कोटी लोकसंख्या आहे. १ कोटी ७६ लाख नोकरी करणारे लोक आहेत.(२०११–१२ च्या सर्वेक्षण नुसार) किती मोठी तफावत आहे. सुप्रीम कोर्टाचे एक न्यायाधीश एम.सी.छागला म्हणतात या देशाचे संविधान एवढे सुंदर आहे,की राज्यकर्त्यांनी त्या संविधानाप्रमाणे राज्यकारभार केला असता तर भारत देश पृथ्वीवरील स्वर्ग निर्माण झाला असता.

संविधानाप्रमाणे जर कारभार केला असता, तर केव्हाचे आम्ही आत्मनिर्भर झालो असतो,अच्छे दिन पण आले असते आणि भारत विश्र्वगुरु पण बनला असता.भारतात ज्यादिवशी सरकारी शाळा दर्जेदार होणार,त्यात शिकणाऱ्या गोरगरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळणार,९० टक्के च्या वर बेरोजगार तरुणांना रोजगार मिळणार,आणि ६० टक्के च्या वर उच्च शिक्षिताचे प्रमाण वाढणार, शेतकऱ्यांच्या समस्या मिटणार, त्यादिवशी आम्ही आत्मनिर्भर होण्याच्या मार्गावर स्थित होऊ.अन्यथा आत्मनिर्भर भारत एक दिवास्वप्न ठरेल!

**विनोद सरदार तेलहरा जिल्हा अकोला.**
**मो.नं.९६८९८४७११५**

# द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी ; राजू श्रीवास्तव

प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर रोजी दुसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती. त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्र्वावर शोककळा पसरली होती. द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत. शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत. पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले. अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले. त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले. देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफटर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले. या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले. त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती. २००९ साली त्यांनी बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती. त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली. आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद

लातूर : अभियंता दिन आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने बांधकाम भवन येथे आज रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. १०५ जणांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून प्रत्येकाने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.




प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, कार्यकारी अभियंता सर्वश्री देवेंद्र नीळकंठ, एम. एम. पाटील, गणेश क्षीरसागर, उप अभियंता संजय सावंत, वाहतूक पोलिस निरीक्षक गणेश कदम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

अपघातामधील जखमी किंवा इतर अनेक रुग्णांना रक्ताची आवश्यकता भासते. अशावेळी गरजूंना पुरेशा प्रमाणात रक्त उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी रक्तदान करणे आवश्यक आहे. लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाने शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित करून अतिशय स्तुत्य उपक्रम राबविला आहे. प्रत्येक व्यक्तीने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामुळे आरोग्य विभागाला मदत होणार आहे. शासकीय रक्तपेढीमध्ये मुबलक प्रमाणात रक्त उपलब्ध होण्यासाठी असे उपक्रम राबविले जाणे आवश्यक आहे. तसेच आपल्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी केले. तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तकेंद्र विभागात रक्तदान करता येईल, असे त्यांनी सांगितले.

लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरासाठी जिल्ह्यातील बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, कंत्राटदार तसेच नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. त्यांच्या सहभागामुळे शासकीय रक्तपेढीमध्ये रक्तसंकलनाला हातभार लाभेल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख म्हणाले. तसेच या शिबिराचे आयोजन करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

तसेच इतक्या व्यापक स्वरूपातील शिबीर आयोजित केल्याबद्दल विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांना सन्मानपत्र देण्यात आले. उपअभियंता संजय सावंत आणि राजेंद्र बिराजदार यांनी या शिबिराच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शाखा अभियंता भास्कर कांबळे यांनी केले. यावेळी लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले लातूर जिल्ह्यातील १९ आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन

लातूर : महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आचार्य चाणक्य कोशल्य विकास केंद्र योजनाचे वर्धा येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये लातूर जिल्ह्यातील १९ महाविद्यालयातील कौशल्य विकास केंद्रांचाही समावेश आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते यावेळी पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचाही शुभारंभ करण्यात आला.




वर्धा येथील कार्यक्रमात राज्यपाल डॉ. सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदींची उपस्थिती होती.

लातूर येथील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी (कॉक्सिट) येथे झालेल्या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त बालाजी मरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आले आहे. याअनुषंगाने १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना राज्य शासनाने सुरु केली आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते या योजनेचा आज ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला.

लातूर जिल्ह्यातील लातूर येथील ब्रीलीयंट महाविद्यालय, महिला बीसीए महाविद्यालय, जयक्रांती आर्टस् अँड कॉमर्स सिनियर कॉलेज, कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी (कॉक्सिट), एम.एस. बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज, महाराष्ट्र इन्स्टिटय़ूट ऑफ नर्सिंग सायन्स एमआयएमएसआर मेडिकल कॉलेज अँड वाय.सी.आर. हॉस्पिटल कॅम्पस, कन्हेरी येथील मांजरा महाविद्यालय, मुरुड येथील संभाजी कॉलेज, चाकूर येथील डी. बी. कॉलेज ऑफ फार्मसी, हाडोळती येथील कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, चापोली येथील संजीवनी महाविद्यालय, उदगीर येथील मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळ, शिवाजी महाविद्यालय, श्री हावगी स्वामी कॉलेज, निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय, औसा येथील कुमारस्वामी महाविद्यालय, अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालय, जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालय आणि शिरूर अनंतपाळ येथील शिवनेरी महाविद्यालयातील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे यावेळी उद्घाटन झाले. या सर्व महाविद्यालयांमध्ये दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक फायदा राज्यातील युवक-युवतींना व्हावा, या दृष्टीकोनातून राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करून महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे.

# लातूर तालुक्यातील सेलू, धनेगावात महिला मेळावा

लातूर : प्रतिनिधीसर्व समान्यांना सत्तेचा वाटा मिळाला पाहिजे, त्यांचा आर्थिक स्तर उंचावून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणने, हा काँग्रेस पक्षाचा विचार आहे. त्या विचाराचे पाईक म्हणून आमदार धिरज देशमुख लातूर ग्रामीण मतदारसंघात सातत्याने विकासाच्या योजना खेचून आणत असून मतदारांच्या अपेक्षा केवळ काँग्रेस पक्षच पूर्ण करु शकतो. त्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी आमदार धिरज देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणाने उभे राहावे, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.



लातूर तालुक्यातील सेलु (बु) व धनेगाव येथे दि. २० संप्टेंबर रोजी महिला बचत गटांचा मेळावा घेण्यात आला त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांशी संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धीरज देशमुख, डॉ. सारीकाताई देशमुख, सुनिता अरळीकर, जयश्री बरमदे, कृषी उत्पन्न बाजार समीतीचे संचालक युवराज जाधव, रेणा साखर कारखान्याचे संचालक ॲड. प्रविण पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना श्रीमती वैशालीताई विलासराव देशमूख म्हणाल्या कि, नुकत्यास संपलेल्या लोकसभेच्या निवडुकीत मतदारांनी भाजपा महायुतीला धडा शिकवत काँग्रेस महाविकास आघाडीला भरभरुन मतदान केले. काँग्रेस महाविकास आघाडीवर मतदारांनी विश्र्वास व्यक्त केले. तब्बल १० वर्षांनंतर डॉ. शिवाजी काळगे यांच्या रुपाने लातूर लोकसभेत काँग्रेस महाविकास आघाडीचे खासदार निवडून आले. विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदार धिरज देशमुख यांच्या प्रयत्नातून लातूर लोकसभेच्या विडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडीचा मोठा विजय झाला. आगामी विधानसभा निवडणुकीतही मतदारांनी काँग्रेस महाविकास आघाडीला शक्ती द्यावी, असे आवाहन केले.

देशातील गोर-गरीबांना १५ लाख रुपये देण्याचे अमिष भाजपाच्या नेत्यांनी दाखवले होते. त्यातील एक छदामही गरीबांना मिळाला नाही, असे नमुद करुन श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या महायुतीने मतदारांना खोटी आश्र्वासने देऊन मतदारांची घोर निराशा केली. शेतकजयांच्या शेतीमालाला भाव नाही, तरुणांच्या हाताला काम नाही, महिलांची सुरक्षा नाही, आरोग्याच्या सुविधा नाहीत. एकेकाळी प्रगत असलेला महाराष्ट्र या महायुती सरकारच्या भ्रष्ट कारभारामुळे आज रसातळाला गेला आहे. त्यामुळे मतदारांनी या महायुतीला आता धडा शिकवावा, असेही त्यांनी सांगीतले.

यापसंगी भाग्यश्री दोरवे, उज्वलाबाई सांडूर, वैशालीताई पाटील, मीरा जाधव, रोहिनी सांडूर, अनिता सांडूर, अनुसया सांडूर, उज्वला सुरवसे, शिवकन्या बेवणाळे, इंदुबाई सुरवसे, सारिका सांडूर, रुपाबाई सांडूर, मैणा सांडूर, सरस्वती सांडूर, सविता सांडूर, बालणबाई सांडूर, जनाबाई सांडूर, गीता सांडूर, मीराबाई बावणे, सुभद्रा घोडके, बालीका चेवले, कौशल्या थोरमोटे, विमल बेंबडे, सुशीला कोळेकर, मणकर्णा गायकवाड, जयश्री हाळे, रब्बाना शेख, पद्मीनी पांढरे, उर्मिला पांढरे, शालुबाई कोळेकर, महानंदा कोळेकर, कांताबाई शेळके, हरीबाई हाळे, गंगाबाई पाटील, सुमनबाई पाटील, विठाबाई पांचाळ, शारुबाई फावडे, लक्ष्मी मेकले यासह आदी महिला उपस्थित होत्या.

### मांजरा परिवारामुळे शेतकजयांत अर्थक्रांती

विकासरत्न विलासराव देशमुख यांनी ४० वर्षांपुर्वी चिंचोलीरावच्या माळरानावर मांजरा सहकारी साखर कारखान्याची मुहुर्तमेढ रोवली. आज मांजरा साखर परिवारातील १० ते १२ साखर कारखाने शेतकजयांच्या सेवेत कार्यरत आहेत. ऊस उत्पादक शेतकजयांच्या ऊसाला सर्वाधिक दर देऊन शेतकजयांच्या जीवनात मांजरा परिवाराने अर्थक्रांती घडवली आहे. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, महीला या सर्वांच्या आशिर्वादामुळेच हे शक्य झाले आहे. सर्वांनी आपला आशिर्वाद आमादर धिरज देशमुख यांच्या पाठिशी कायम ठेवावा, असे आवाहन यावेळी बोलताना रीड लातूरच्या संस्थापिका सौ. दीपशिखा धिरज देशमुख यांनी केले.

# महानगरपालिके मार्फत दंतशल्यचिकित्सा सुविधेस सुरुवात

लातूर/प्रतिनिधी:लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभागा अंतर्गत विविध आरोग्य विषयक सेवा सुविधा नागरिकाना दिले जातात. परंतु, यामध्ये दंतशल्यचिकित्सा उपलब्ध नसल्या कारणाने ही सेवा लातूर शहर वासियांना उपलब्ध करून देण्याचा मानस मनपा प्रशासनाचा होता. तसेच माईर्स पुणे चे महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च (दंत महाविद्यालय व रुग्णालय) लातूर चा उद्देश समाजातील शेवटच्या घटका पर्यंत दंत चिकित्सा सुविधा पुरविणे आहे.



त्यादृष्टीने आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मनपाच्या वतीने उपायुक्त(आरोग्य) डॉ पंजाब खानसोळे, आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती व चखऊ्छठ प्राचार्य डॉ कांगणे यांनी योग्य ती प्रक्रिया पूर्ण करून दोन्ही संथांच्या सहकार्याने व परस्पर संमतीने नागरिकांसाठी दंतशल्यचिकित्सा सुविधा सुरु करण्याच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आले आहेत या करारा अंतर्गत मनपातील चार(४) प्रा. आरोग्य केंद्र येथे अतिशय अल्प दरात दंत चिकित्सा सुविधा तज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे. यामधे नियमित दंत तपासणी(OPD) सोबतच स्केलिंग, रूट कॅनल, दात काढणे, दातात सिमेंट भरणे आदि सेवा देण्यात येणार आहेत. तसेच संदर्भीय सेवा या MIDSR येथील रुग्णालयात दात इम्प्लंट करणे, दंत कॅन्सर, गुंतागुंतीची शस्त्रक्रिया आदि सुविधा देण्यात येणार आहेत.

आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी यावेळी MIDSR दंत महाविद्यालयाचे दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. तरी नागरिकांनी खालील नमूद केलेल्या चार ठिकाणी १) प्रा.ना.आ.केंद्र इंडिया नगर २) प्रा.ना.आ.केंद्र गौतम नगर ३) प्रा. ना. आ. केंद्र तावरजा कॉलनी ४) मनपा दवाखाना काळे गल्ली या ठिकाणी दंतशल्यचिकित्सा सेवेचा लाभ दिनांक २३-९-२०२४ पासून सकाळी १० ते २ या वेळेत घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# लोकनेते सुंदररावजी सोळंके यांचे मराठवाडा विकासात अमूल्य योगदान: नामदार संजय बनसोड

माजलगाव (प्रतिनिधी):केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई)आयोजित व्हॉलीबॉल क्लस्टर ९ स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार दि.२० रोजी महाराष्ट्राचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते सिंदफणा पब्लिक स्कूल येथे संपन्न झाले.या कार्यक्रमाला बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती.आपल्या भाषणात क्रीडामंत्री बनसोडे यांनी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय सुंदररावजी सोळंके यांच्या कार्याचा गौरव केला.ते म्हणाले, सुंदररावजी सोळंके यांचे मराठवाडा विकासामध्ये अमूल्य योगदान आहे.त्यांच्या कार्यकाळात मांजरा प्रकल्प,धनेगाव धरण, माजलगाव धरण यांसारखे अनेक महत्त्वाचे सिंचन प्रकल्प पूर्ण झाले.



नामदार संजय बनसोडे यांनी माजलगावमध्ये नवीन क्रीडा संकुल उभारण्यासाठी भरीव निधी देण्याचे आश्र्वासन दिले.त्यांनी आपल्या कारकीर्दीत महाराष्ट्रभर अनेक क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्याचेही सांगितले. क्रीडामंत्र्यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांना महायुती सरकारचा पूर्ण पाठिंबा राहील,असे आश्र्वासनही दिले.सीबीएसईच्या या व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्र आणि गोव्यातील संघ सहभागी झाले आहेत.स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याला महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे पंच,विविध संघ आणि त्यांचे प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके,सचिव मंगलाताई सोळंके,धैर्यशील काका सोळंके, जयसिंगभैया सोळंके,उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,तहसीलदार संतोष रुईकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे,अच्युतराव लाटे,बुखारी शाळेचे सचिव खुर्शीद नाईक,गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी,सीबीएसई क्लस्टरचे निरीक्षक प्रवीण चाळक, सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख,उपप्राचार्य राहुल कदम आणि लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेचे कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके, प्राचार्य गोवर्धन सानप,जिल्हा क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण,पालक,विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सिंदफणा पब्लिक स्कूलला व्हॉलीबॉल क्लस्टरचे यजमानपद मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाने मराठवाड्यातील क्रीडा क्षेत्रातील विकासाला चालना देण्याचे संकेत दिले असून,स्थानिक पातळीवर क्रीडा सुविधा वाढवण्याच्या शासनाच्या प्रयत्नांचे प्रतिबिंब दिसले.

# दुभाजकाची स्वच्छता आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन चा उपक्रम

शहरात सर्वत्र ठिकठिकाणी कचरयाचे ढीग साचलेले आहेत आणि हीच अवस्था दुभाजकांची सुद्धा आहे. प्रशासनाला मदत होईल या उद्देशाने आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनच्या सदस्यांनी अंबाजोगाई रस्त्यावरील अंबा हनुमान ते हॉटेल पार्थपर्यंत दुभाजक स्वच्छता मोहीम पूर्ण केली. यावेळी दुभाजकातून चार ट्रॅक्टर केरकचरा, हॉटेलमधील म्हणून टाकलेले शिल्लक अन्नधान्य, भंगार साहित्य, दारूच्या बाटल्या, शेजारच्या दुकानदारांनी आणून टाकलेलं साहित्य, झाडाच्या सुकलेल्या फांद्या दुभाजकाच्या बाहेर काढून एकत्रित केल्या. दुभाजकातील झाडांच्या कटिंग करून त्यांना आकार दिला, दुभाजकातील गवत कापून काढले.



ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन च्या वतीने प्रत्येक तीन महिन्याला या रस्त्यावरील दुभाजक स्वच्छ केले जातात.

यावेळी ग्रीन लातूर वृक्ष चे चाटे सर यांनी परिसरातील नागरिकांना दुभाजकात कचरा टाकू नये याबाबत विनंती केली.

सध्या सर्वत्र चिकनगुनिया, मलेरिया, डेंग्यूची साथ सुरू आहे आणि आपला परिसर स्वच्छ असावा याकरिता स्वच्छता मोहिमेची नितांत गरज आहे ही गरज लक्षात ठेवून जागतिक स्वच्छता दिन निमित्ताने आज स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

# मराठा क्रांती मूक मोर्चा, आठ वर्ष सरली आरक्षण नाही

लातूर, प्रतिनिधी: लातूर जिल्ह्यात एक मराठा लाख मराठा या जाणीवेने एकत्र येत मूक मोर्चाच्या माध्यमातून सकल मराठा समाजाने मराठा आरक्षणासाठी शासनास विनंती केली होती तथापि एवढा प्रदीर्घ कालावधी उलटुनही हा प्रश्र्न मार्गी न लावल्याने सत्ताधारी व विरोधक दोघांचाही लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने निषेध करण्यात आला. मराठा आरक्षण योध्दे मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांचे समर्थन करीत मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण देण्यात यावे तसेच निजाम गॅझेट लागू करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.

लातूर मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने लातूर येथे काढण्यात आलेल्या मूक मोर्चास १९ सप्टेंबर २०२४ रोजी आठ वर्ष पूर्ण झाले. त्या औचित्यावर घेण्यात आलेल्या बैठकीत मराठा आरक्षणासाठी जिल्ह्यात करण्यात आलेल्या विविध आंदोलनाच्या संदर्भाने मंथन करण्यात आले. मराठा समाजाची स्थिती अत्यंत हलाखिची असून समाजातील बहुसंख्य बांधवांना रोजचा दिवस काढणे कसरतीचे झाले आहे. आरक्षणाअभावी युवक-युवतींची परवड होत आहे. पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च पालकांना परवडत नसल्याने अनेकांना अर्ध्यावर शिक्षण सोडण्याची वेळ आली आहे. शिकुनही नौकरी मिळत नसल्याने हतबलतेने अनेक युवकांनी आत्महत्या केल्या आहेत. आर्थिक हतबलतेने अनेक पालकांनी मरणाला कवटाळले आहे. अशा घटना अजुनही घडतच आहेत. हे सारे थांबवण्यासाठी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिले पाहीजे व ते मिळेपर्यंत आपण स्वस्थ बसायचे नाही,असा निर्धार यावेळी समाजबांधवांनी केला. मराठा समाजाचा वनवास केवळ टिकावू आरक्षणाशिवाय थांबणार नाही. असे असतानाही सत्ताधारी व विरोधक केवळ एकमेकांवर दोषारोप करीत या प्रश्र्नाचे राजकारण करुन तो ताटकळत ठेवत असल्याचे स्पष्ट करीत सरकार व सत्ताधाऱ्यांच्या या विसंगत मानसिकतेचा यावेळी समाजबांधवांनी तीव्र निषेध केला. मराठा समाजास ओबीसीतून टिकणारे आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील प्राणांतीक उपोषण करीत आहेत ती मागणी तातडीने मान्य करावी अशी मागणी या बैठकीत करण्यात आली.

## हट्टी ..

निसर्ग रम्य डोंगर
वसती झोपडपट्टी
कायम करी वस्ती
भलतीसलती हट्टी
दबक्या पावलांनी
आधी येते एकटी
व्यापतेपूर्णपरिसर
गजबज हो शेवटी
नोकरशाही सोबत
तिची असे घट्टगट्टी
कायद्यां नियमांशी
कायम कशी कट्टी
अतिक्रमणतोडाया
येतात निग्रही हट्टी
थांबवायला त्यांना
पुरते नेत्यांची चिठ्ठी
फिरकत नसते इथे
कडकपोलीसकाठी
विविधपक्ष्यांचे झेंडे
क्शन आडकाठी
नको रे अतिक्रमण
मोजायं ना फूटपट्टी
सगळे मिळतेफुकट
नसे टॅक्स पाणीपट्टी
समस्तनेत्यांना प्रिय
मतांची भरगच्चपेटी
तोडकामाचे हातोडे
भिती पराजयापोटी
पुनर्वसनधूमधडाका
सगळेचं सक्षमपाठी
निवडणूकीतोंडावरी
वाढतात गाठी भेटी
वारंवार परत वसते
हलवली झोपड पट्टी
रहिवासी फक्तवेगळे
कहाणी तीचं ती हट्टी

**--हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६,**
www.kavyakusum.com

## उत्तम कलावंत आयुष्याच्या कार्यशाळेत घडतो ज्येष्ठ रंगकर्मी अँड. शैलेश गोजमगुंडे



लातूर : उत्तम कलावंत जीवनातील प्रत्येक क्षेत्रातील सूक्ष्म निरीक्षण करून आयुष्याच्या कार्यशाळेत घडत असतो असे प्रतिपादन जेष्ठ रंगकर्मी तथा सुप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक अँड. शैलेश गोजमगुंडे यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात आयोजित सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन व एकदिवसीय कार्यशाळेत उद्घाटक म्हणून बोलत होते

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय दुर्वासराव गवई हे होते तर मंचावर सुप्रसिद्ध संगीतकार प्रा. शशिकांत देशमुख, खट–उ समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. सिद्राम डोंगरगे, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर आणि नटराज्याचे पूजन करण्यात आले त्यानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले यावेळी महाविद्यालयातील संगीत विभागाच्यावतीने प्रा. विश्र्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार, प्रा. सरस्वती बोरगावकर व संगीत चमुने स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना शैलेश गोजमगुंडे म्हणाले की, उत्तम जीवन जगण्यासाठी कला ही अत्यावश्यक गोष्ट आहे. प्रत्येकाला कोणती तरी कला अवगत असणे हे त्याच्या आत्मिक सुखाच्या अनुभूतीसाठी नितांत महत्त्वाची आहे. कलावंत हा जाणीवपूर्वक घडवावा लागतो त्याच्या अंगीभुत गुण कौशल्यातून पुढे तो घडत जातो प्रगल्भ जाणिवेची रशिक्ता समाजामध्ये निर्माण करून समाजात जोपर्यंत सांस्कृतिक चळवळी वाढणार नाहीत तोपर्यंत समाजाची कलाक्षेत्राकडे पाहण्याची दृष्टी आणि दृष्टिकोन बदलणार नाही असेही ते यावेळी म्हणाल यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शशिकांत देशमुख म्हणाले की, संगीत ही विश्र्वाची भाषा आहे संगीत आणि मानवी जीवन समृद्ध होत असते कलावंतांनी अधिकाधिक सराव व परिश्रम केल्यास संगीत क्षेत्रातल्या जाणिवा समृद्ध होत जातील असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, संगीत या कला प्रकारात प्रचंड ऊर्जा शक्ती असते. वाद्यातून तयार होणारा नाद आत्मिक आणि मानसिक समाधान देतो. ग्रामीण भागात अनेक उत्तम कलावंत आहेत त्यांच्या कलांना वाव देण्याची नितांत आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले सूत्रसंचालन डॉ. राहुल डोंबे यांनी केले तर आभार प्रा. शैलेश कानडे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता डॉ यशवंत वळवी, डॉ. जितेंद्र देशमुख, डॉ. मनोहर चपळे, प्रा. नागेश जाधव, डॉ गीता गीरवलकर, डॉ. अश्र्विनी रोडे, डॉ. किरण शिंदे, प्रा. भाग्यश्री वाघमारे, बालाजी डावकरे, संगमेश्र्वर मुळे आणि नंदू काजापुरे यांनी परिश्रम घेतले.

## तीन सराईत गुन्हेगार लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार). पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची कारवाई

लातूर (पोअका) : पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण, तसेच लातूर शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या सराईत तीन गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारीची (तडीपार) कारवाई करण्यात आली आहे. हद्दपारची कारवाई करण्यात आलेल्याचे नावे १) राहुल चंद्रकांत वाघमारे, वय ३१ वर्ष, राहणार म्हाडा कॉलनी, लातूर. २) आकाश भगवान काळे, वय २८ वर्ष, राहणार काळे गल्ली, लातूर. ३) रणजीत दयानंद कांबळे,वय २८ वर्ष, राहणार महाराणा प्रताप नगर, बाभळगाव रोड, लातूर. असे असून नमूद आरोपींतावर सन २०१४ ते २०२४ कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे हद्दीमध्ये टोळी तयार करून समाजविघातक कारवाया करणे, परिसरातील व्यावसायिक व रहिवासी लोकांच्या मालमत्तेला इजा पोहोचून भय निर्माण करणे, प्राणघातक शस्त्र वापरून जबरीचोरी, चोरी करणे, रात्री अपरात्री रस्त्यावरील वाहने अडवून लुटणे, आजन्म कारावास किंवा अन्य करावासाचे शिक्षेस प्राप्त असलेले गुन्हे करणे, शांतता भंग करणे, यासारखे गंभीर गुन्हे दाखल असून त्याच्यामुळे सामाजिक शांतता धोक्यात आली होती. जिल्ह्यात शांतता अबाधित राहावी. याकरिता नमूद सराईत गुन्हेगारां कडून कोणत्याही प्रकारचे गैरकायदेशीर कृत्य घडू नये, याकरिता लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार मालमत्ता विषयी व शरीराविषयी गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करून सामाजिक शांतता करणाऱ्या गुन्हेगाराना ०१ वर्षासाठी लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार) करण्यात आले असून नमूद गुन्हेगारांना लवकरच लातूर जिल्ह्याच्या हद्दीच्या बाहेर सोडण्यात येणार आहे. नमूद आरोपी विरुद्ध उपविभागीय पोलीस अधिकारी, उदगीर सोहेल शेख, पोलीस ठाणे उदगीर ग्रामीणचे तत्कालीन पोलीस निरीक्षक अरविंद पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, पोलीस अमलदार प्रदीप स्वामी यांनी सविस्तर हद्दपार प्रस्ताव तयार करून पाठवले होते. त्यावर पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्याकडे पाठविले होते. त्यावर पोलीस अधीक्षकांनी सदर प्रस्तावांचे अवलोकन करून नमूद आरोपी मुळे सामाजिक शांततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने व आगामी काळात होणारे निवडणुका व सण–उत्सव अनुषंगाने त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ प्रमाणे कार्यवाही करून सदर सराईत गुन्हेगारांना लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार) करण्यात केले आहे.

कारवाईच्या माध्यमातून गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत गुन्हेगार, उपद्रवी लोकांवर जरब बसवण्यासाठी गुन्हेगाराला जिल्ह्यातून हद्दपार केल्यामुळे इतर गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यां गुन्हेगारांना चांगलाच दणका बसला आहे.

### मनोज सौनिक यांनी स्वीकारला महारेराचा पदभार

मुंबई, : महाराष्ट्र स्थावर संपदा



नियामक प्राधिकरणाच्या (महारेरा) अध्यक्षपदी राज्याचे माजी मुख्य सचिव मनोज सौनिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनोज सौनिक यांनी महारेराचे अध्यक्ष म्हणून आज पदभार स्वीकारला. गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी आज मंत्रालयात श्री. सौनिक यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.

यावेळी गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, महारेराचे सदस्य महेश पाठक, माजी सदस्य एस. एस. संधू, महारेराचे मावळते अध्यक्ष अजोय मेहता तसेच गृहनिर्माण विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून भिसे वाघोली प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर

लातूर : लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राला भारतीय जनता पार्टीचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्यातील महायुती शासनाने दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे भिसे वाघोली आणि परिसरातील रुग्णांची मोठी सोय होणार आहे.

ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित व्हावे यासाठी भाजपाचे नेते आ, रमेशआप्पा कराड यांनी राज्यातील महायुती शासनाचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ, तानाजी सावंत यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून ग्रामीण भागाची गरज लक्षात घेऊन महायुती शासनाच्या निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये



भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजुरी दिली आहे.

लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाल्याने भिसे वाघोली सह भोसा, वाडीवाघोली, निळकंठ, शिराळा, येळी, पिंपरीआंबा, माटेफळ, करकटा, खुंटेफळ, बोरगाव, हिसोरी, खंडाळा आदी आजूबाजूच्या अनेक गावातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सदरील आरोग्य केंद्र मंजूर व्हावे यासाठी विशेष प्रयत्न करून मंजुरी मिळवून घेतल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संभाजी वायाळ, सरपंच सौ. स्वंयम वायाळ, भैरवानाथ पिसाळ, शामसुंदर वाघमारे, बाबा भिसे, सुरज शिंदे, विश्वास कावळे, काशीनाथ ढगे, रशिद पठाण, योगीराज साखरे, काकासाहेब पाटील, बाबासाहेब देवकर, नामदेव मांडे, संदीप भुजबळ, तात्यासाहेब औताडे, सुधाकर नाना काळे, धनंजय जाधव, अरविंद पारवे, सचिन सवई, राहूल काळे, संदीपान काळे, बालाजी नाईकवाडे, भाऊसाहेब भिसे, शुभम खोसे, सचिन हींगे, नवनाथ भिसे, राहूल भिसे, प्रदिप शिंदे, राजाभाऊ मरे, बालाजी शिंदे, विष्णू महानवर, श्रीमंत शिंदे, काकासाहेब साखरे, जणाबाई साखरे, शिवाजी आडसूळ, विश्वनाथ शिंदे, मधुकर शिंदे, अरुण शिंदे, शिवराम शिंदे यांच्यासह भिसे वाघोली आणि त्या परिसरातील भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आभार व्यक्त केले आहे.

## भाजप नेत्या सौ.निर्मलाताई कांबळे यांच्या पाठपूराव्याने मा.खा.सुधाकरराव शृंगारे यांच्या निधितुन प्रभाग क्र.02 च्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

लातूर : लातूर शहर पूर्व भागातील महिला भाजपा नेत्या निर्मलाताई कांबळे यांनी प्रभाग क्रमांक २ मधील भारत सोसायटी गवळी नगर भागात गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला कच्या रस्त्यामुळे नागरिकांना समस्या निर्माण होत होती सदरील नागरी समस्या दूर करण्यासाठी पूर्व भागातील महिला भाजपा नेत्या निर्मलाताई कांबळे यांनी लातूर चे माजी खासदार सुधाकरराव श्रृंगारे यांच्या कडे सतत पाठपुरावा करून या भागातील चार कच्चे रस्ते विकास कामाकरिता खासदार स्थानिक विकास निधीस मंजुरी मिळवली सदरील रस्त्यास प्रभागातील नागरिकांच्या हस्ते आज दि. २०सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री फळ फोडून उदघाटन करण्यात आले यावेळी



उपस्थित भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा सौ.रागिणीताई यादव,माजी नगरसेवक रविभय्या सुडे, मंडल अध्यक्ष प्रमोदभाऊ गुडे, सौ.रत्नमालाताई घोडके,भाजपा युवा नेता अरुण जाधव,अतिष कांबळे,सौ.रेखाताई टेंकाळे,शामल खराडे,पुर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे,बाबासाहेब बनसोडे,प्रा. अनंत लांडगे,मन्मथ स्वामी,कांबळे पोलिस,मांडी बोने,डॉ.कसबे, शुभम कांबळे,वैभव कांबळे,संतोष ताडमाडगे,शोभाबाई भुजबळ,सत्तार भाई,निखिल कसबे सह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

### राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त उद्या जुहू बीच येथे ‘स्वच्छता मोहीम’

मुंबई, : नागरिकांमध्ये सागरी प्रदूषणाविषयी जागृती करणे आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे या उद्देशाने आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनाच्या निमित्ताने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २१ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजता जुहू किनाऱ्यावर स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

केंद्रीय वने, पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्रालय व महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने या स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेमध्ये लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, युवा संघटना, राष्ट्रीय छात्र सेना, सागरी सुरक्षा दल सहभागी होणार आहेत.

राष्ट्रीय किनारी अभियान योजनेअंतर्गत सर्व १३ किनारी राज्यांमध्ये २१ सप्टेंबर, २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आली आहे. याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गेल्या ४ वर्षांपासून देशात सागरी किनारा स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. या दिवशी राज्यातील सागरी किनाऱ्यावरील सर्व जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीने सागरी किनारा स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे.

## मातंग समाजाचे प्रश्र्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक – मंत्री शंभूराज देसाई

मुंबई :– सकल मातंग समाजाच्या अनेक मागण्या आहेत. यापैकी बऱ्याचशा मागण्या शासनाने पूर्णत्वास नेल्या आहेत. समाजाच्या उर्वरित मागण्या पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे. सकल मातंग समाजाचे प्रश्र्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक आहे, असे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी आज सांगितले.



सकल मातंग समाजाच्या विविध प्रश्र्नांबाबत मंत्रालयातील समिती कक्षामध्ये आयोजित बैठकीत उत्पादन शुल्क मंत्री श्री. देसाई बोलत होते. बैठकीस आमदार बालाजी कल्याणकर, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, सकल मातंग समाजाच्यावतीने मच्छिंद्र सकटे, श्री. वाडेकर, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव सोना बागुल आदींसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त ओमप्रकाश बकोरीया उपस्थित होते.

उत्पादन शुल्क मंत्री श्री. देसाई म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती प्रवर्ग आरक्षण उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्यांना दिला आहे. राज्य शासनाच्या अधिकारात याबाबत करता येणारी कार्यवाही, असलेले अधिकार यासंदर्भात कायद्याच्या चौकटीत बसविण्यासाठी न्यायिक समिती स्थापन करण्याची कार्यवाहीबाबत शासन विचार करीत आहे. मातंग समाजाच्या उपवर्गीकरणाबाबत अभ्यास समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा. प्रशासनाच्या सहकार्याने समाजाच्या मागण्या पुर्ण करण्याची कार्यवाही गतीने करण्यात येत आहे.

आर्टीचे कार्यालय सुरू करण्यात आले असून या माध्यमातून समाजाच्या उत्थानासाठी कार्य गतीने करण्यात यावे. अण्णाभाऊ साठे आर्थिक मागास महामंडळाने १५ लक्ष पर्यंत बिनव्याजी कर्ज योजना राबवावी. महामंडळाच्या योजनांची कर्ज प्रकरणे बँकांनी प्राधान्याने मंजूर करण्याबाबत बँकांना सुचीत करावे. लहुजी साळवे अभ्यास आयोगाने दिलेल्या शिफारशी लागू करण्याबाबत सुधारीत आदेश निर्गमीत करण्यात यावे. लहुजी वस्ताद साळवे स्मारकाचे काम पुण्यात सुरू आहे. स्मारकाचे काम दर्जेदार करण्यात यावे, अशा सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

मंत्री श्री. देसाई म्हणाले, वाटेगांव (जि. सांगली) येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी जागेचे तातडीने भूसंपादन करण्यात यावे. भूमापनाची कार्यवाही पुर्ण करण्यात यावी. लहुजी वस्ताद साळवे व अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी निधीची कमतरता नाही.

बैठकीस संबंधित विभागाचे अधिकारी व सकल मातंग समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## विधानसभा निवडणुकीसाठी बृहन्मुंबई क्षेत्रात १० हजार १११ मतदान केंद्रे

मुंबई, : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक–२०२४ च्या पार्श्र्वभूमीवर, भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, मतदारांना सुलभतेने मतदान करता यावे, या दृष्टिकोनातून बृहन्मुंबई क्षेत्रातील (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हे) मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. या सुसूत्रीकरण कार्यक्रमामुळे बृहन्मुंबई क्षेत्रातील मतदान केंद्रांची संख्या १० हजार १११ झाली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या तुलनेत मतदान केंद्रांच्या संख्येत २१८ ने वाढ झाली आहे. यामध्ये प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पूर्वी असणारी सरासरी १५०० मतदारांची संख्या आता सरासरी १२०० पर्यंत असेल, त्यामुळे मतदान केंद्रांची संख्या वाढली असून परिणामी मतदानाचे प्रमाण आणि वेग वाढण्यास मदत होणार आहे.

निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशांनुसार, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाकडून नियोजनबद्ध पद्धतीने तयारी सुरू आहे. याच धर्तीवर मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई क्षेत्रातील मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करताना प्रामुख्याने एका मतदान केंद्रावर सरासरी १२०० पर्यंत मतदारसंख्या राहील, हे सूत्र लक्षात ठेवून मतदान केंद्रांची संख्या निश्र्चित करण्यात आली आहे. तर, अधिक मतदान केंद्र असणाऱ्या एकाच ठिकाणावरील मतदान केंद्रांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या तुलनेत बृहन्मुंबईतील काही भागांमध्ये मतदान केंद्रांची संख्या वाढली आहे.

याच अनुषंगाने बृहन्मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदान केंद्रांमध्ये झालेल्या सुसूत्रीकरणाची माहिती देण्यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात १९ सप्टेंबर २०२४ रोजी बैठक पार पडली. मतदान केंद्र सुसूत्रीकरणाची माहिती देण्यासाठी, मतदारांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री. भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्र्विनी जोशी यांनी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन सविस्तर माहिती दिली. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, संबंधित अधिकारी आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ वेळी मुंबई शहर जिल्ह्यामध्ये एकूण २ हजार ५०९ मतदान केंद्र होते. तर, मुंबई उपनगर जिल्ह्यात ही संख्या ७ हजार ३८४ होती. सुसूत्रीकरण कार्यक्रमामुळे मतदान केंद्रांची संख्या अनुक्रमे २ हजार ५३७ आणि ७ हजार ५७४ म्हणजेच संपूर्ण बृहन्मुंबई क्षेत्रात (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हे) १० हजार १११ इतकी झाली आहे.

सुसूत्रीकरण केल्याने मतदान केंद्रांच्या ठिकाणांमध्ये झालेल्या नवीन बदलांसंदर्भात मतदारांना माहिती देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने ‘आपले मतदान केंद्र जाणून घ्या’ म्हणजेच ‘घपेु धीी झेश्रश्रळपस डींरींळेप’ ही जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत मतदार नोंदणी अधिकारी मतदारांच्या घरी जाऊन मतदान केंद्रांच्या ठिकाणामध्ये झालेल्या बदलांची माहिती देतील. याशिवाय, नोंदणीकृत मतदारांना लेखी पत्राद्वारे तसेच प्रसारमाध्यमांच्या माध्यमातूनही माहिती देण्यात येईल, असेही प्रशासनाकडून कळविण्यात येत आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894